सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १०८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ५ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# मॉन्सून महाराष्ट्राच्या उंबरठ्यावरः गोव्यात धडक

## पुढील ४८ तासांत कोकणात जोरदार पावसाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ मुंबई–** मान्सून आता महाराष्ट्राच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला असून राज्यातील नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा केली आहे. त्यानंतर मान्सूनची वाटचाल वेगाने सुरू असून तो आता गोव्यात पोहोचला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील २ ते ३ दिवसांत महाराष्ट्रात मान्सून प्रवेश करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. यंदा मोसमी वारे राज्यात वेळेत दाखल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष आता मान्सूनच्या आगमनाकडे लागले आहे.

मान्सूनच्या आगमनापूर्वीच राज्यातील काही भागांत पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक ठिकाणी मान्सूनपूर्व पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी कोसळल्या. विशेषतः कुडाळ तालुक्यात विविध भागांत पाऊस पडल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला. हवामान विभागाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात १० ते २० मि.मी. पावसाचा अंदाज व्यक्त केला असून जिल्ह्यासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोकण




किनारपट्टीवर पावसासाठी अनुकूल स्थिती तयार होत असल्याचेही हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.


हवामान विभागाने पुढील ४८ तास महाराष्ट्रासाठी महत्त्वाचे असल्याचे म्हटले आहे. प्रवीण कुमार यांच्या मते, पुढील ४८ तासांत दक्षिण महाराष्ट्र आणि कोकण पट्ट्यात पावसाची शक्यता अधिक आहे.

# संजय राऊतांनी नाशिकमधून किती बॅगा भरून आणल्या?

## माणसं सांभाळायला पैसे...; भाजपचा घणाघात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई –** विधान परिषद निवडणुकीत घोडेबाजार चालू असल्याचा आरोप उद्धवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केला. या आरोपांना भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी प्रत्युत्तर दिले. माणसं टिकवण्यासाठी पैसा नाही तर प्रेम आणि माणुसकी लागते. मात्र संजय राऊत आणि त्यांच्या नेतृत्वाकडे माणुसकीच उरलेली नसल्याने त्यांच्याकडे ना कार्यकर्ते टिकले, ना नेते टिकले. भारतीय जनता पार्टी आणि महायुती प्रेमाने माणसं जोडण्याचं काम करते. राऊतांच्या उद्धवसेनेने नाशिकमध्ये उमेदवार दिला नाही, मग त्या बदल्यात किती बॅगा भरून नेल्या? ज्या १५० कोटींचा ते आरोप करतात, त्या आरोपांपूर्वी राऊतांनी नाशिकचा हिशेब द्यावा, अशा शब्दांत नवनाथ बन यांनी राऊतांवर टीकास्त्र सोडले. नाशिकचे संपर्क प्रमुख असलेल्या संजय राऊत यांनी विधान परिषदेसाठी उमेदवार का दिला



नाही? दोन अर्ज घेऊनही उमेदवारी न देण्यामागे कोणती सेटलमेंट झाली, याचा खुलासा राऊतांनी करावा. इतरांवर आरोप करण्यापूर्वी नाशिक दौऱ्यातून किती बॅगा भरून आणल्या याचं उत्तर द्यावं अशी मागणीही त्यांनी केली. हिंदुत्वाला नाही, तर उबाठा गटालाच जनतेने बुच लागलं आहे. संजय राऊत यांनी हिंदुत्वावर वक्तव्य केले. हिंदुत्वाला बुच लावण्याची कोणाचीही हिंमत नाही. बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्ववादी विचार आजही जिवंत आहेत. उलट विधानसभा निवडणुकीत जनतेने उबाठा गटालाच बुच लावले हे वास्तव राऊतांनी स्वीकारावं, असा टोला त्यांनी लगावला.

# मराठा आरक्षण आंदोलनातील ३४ मृतांच्या वारसांना प्रत्येकी १० लाखांची मदत, सरकारची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई –** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेल्या विविध आंदोलनांतील मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. आठ जिल्ह्यांतील ३४ व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपयांप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. ३० मे रोजी रणरणत्या उन्हात मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण केले. त्यानंतर शासन दरबारी अनेक तातडीचे निर्णय घेण्यात आले. त्यात हा एक निर्णय समोर आला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शब्द खरा करून



दाखवला.

मराठा समाजाच्या मागण्यांसाठी राज्यातील विविध ठिकाणी झालेल्या आंदोलनांत एकूण ३०९ कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने या मृत व्यक्तींच्या वारसदारांसाठी २७ कोटी ५० लाख रुपये मंजूर केले आहेत. यापैकी ३४ व्यक्तींच्या कुटुंबांना मदत मिळणे अद्याप बाकी होते. अखेर या ३४ व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपयांप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे सरकारने त्यांचे आश्वासन पाळले आहे.

अंतरवाली सराटी येथे ३० मे रोजी मराठा आरक्षणातील प्रलंबित मुद्यांवर मनोज जरांगे पाटील हे रणरणत्या उन्हात उपोषणाला बसले. त्यापूर्वी आणि आंदोलनावेळी जलसंपदा मंत्री (कृष्णा व गोदावरी खोरे) मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी जरांगे पाटील यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. जरांगे पाटील उर्वरीत मागण्या पूर्ण करण्यासाठी आग्रही होते. विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली आणि प्रलंबित मागण्यांसह उर्वरित वारसांना तातडीने मदत देण्याची ग्वाही उपोषण स्थळी दिली होती.

# उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने संतप्त कॉंग्रेसजन जोडे घेऊन तयार

## दुसरीकडे ‘मॅनेज’ म्हटल्याने आदिवासी समाज आंदोलनाच्या पवित्र्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५वर्धा :** वर्धा – चंद्रपूर – गडचिरोली या स्थानिक स्वराज्य मतदारसंघाच्या निवडणुकीत काँग्रेसतर्फे शैलेश अग्रवाल हे रिंगणात होते. काँग्रेसच्या किसान मोर्चाचे समन्वयक असलेले अग्रवाल यांनी मात्र ऐनवेळी अर्ज मागे घेत भाजपचे अरुण लखानी यांच्या अविरोध विजयाचा मार्ग मोकळा करून दिला. ते करतांना त्यांनी काही काँग्रेस नेत्यांवर आगपाखड केली. तसेच आदिवासी मतदार यांच्याविरोधात आक्षेपर्ह टिपणी केली. अर्ज मागे घेतल्याने अग्रवाल यांच्या विरोधात समाज माध्यमावर चांगलीच राळ उठली आहे. अग्रवा ल यांची ही कृती म्हणजे पक्षद्रोह, ते कितीत मॅनेज झाले, त्यांनी कोणाची कृपा स्वीकारली अशा व अन्य कॉमेंट्स माध्यमावर उमटत आहे. काँग्रेसवाले संतप्त तर भाजप नेतेही जाहीर खिल्ली उडवीत असल्याचे दिसून येत आहे. गद्दार ही संभावना तर खुलेआम सूरू झाली आहे. जिल्ह्यातील सर्व काँग्रेस कार्यकर्ते व नेत्यांची मान अग्रवाल यांच्या कृतीने खाली गेली. ही दुर्दैवी घटना, अशी टीका काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे यांनी केली आहे. काँग्रेस



साठी ही बाब लांच्छनास्पद ठरली आहे. कार्यकर्त्यांच्या मनात तीव्र असंतोष आहे. त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्याची मागणी झाली असल्याचे कोल्हे म्हणतात.

ऐनवेळी उमेदवारी मागे घेणाऱ्या शैलेश अग्रवाल यांचा आज निषेध सूरू झाला. तसेच आज ५ जून रोजी दुपारी ४ वाजता काँग्रेस नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते एकत्र येत अग्रवाल यांच्या फोटोस जोडे मारून संताप व्यक्त करणार. काँग्रेसच्या सदभावना भवन या कार्यालयात हे आंदोलन होत असल्याचे सुनील कोल्हे यांनी सांगितले. अग्रवाल यांच्या विरोधात कारवाई होईपर्यंत निषेध सूरू राहणार, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.शैलेश अग्रवाल यांनी निवडणुकीतून माघार घेतांना काही स्पष्टीकरण दिले. त्यात ते म्हणतात की आदिवासी क्षेत्रातील मतदार ‘ मॅनेज ‘ झालेत. आदिवासी मतदारांच्या लोकशाही निर्णयक्षमतेस मॅनेज म्हणणे त्यांचा अवमान होय, अशी भावना जनसेवा गोंडवाना पार्टीने व्यक्त केली आहे. एका पत्रकातून संघटना नेते अवचितराव सयाम हे म्हणतात की हा तर अग्रवाल यांनी लोकशाहीवार केलेला हल्लाच ठरतो. त्याचा निषेध. राजकीय अपयशचे खापर आदिवासी समाजावर फोडणे आणि त्यांच्या मतदानाच्या अधिकारावर संशय घेणे हे गैर आहे. संबंधित नेत्याने या वक्तव्याबद्दल तात्काळ स्पष्टीकरण द्यावे व सार्वजनिक माफी मागावी. अन्यथा समाज तीव्र आंदोलन करणार. तसेच कायदेशीर कारवाई पण करण्याची भूमिका राहील, असे सयाम स्पष्ट करतात. महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेणारे यवतमाळ मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे उमेदवार साहेबराव कांबळे आणि चंद्रपूर मतदारसंघातील उमेदवार शैलेश अग्रवाल यांची काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्ष नेतृत्वाला अंधारात ठेवून अर्ज मागे घेतल्याने दोन्ही उमेदवारांवर कारवाई करण्यात आली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ही कारवाई केली असून या दोघांचे पक्ष सदस्यत्वही रद्द करण्यात आले आहे.

### अग्रवाल ,कांबळे यांची पक्षातून हकालपट्टी ,सदस्यत्वही रद्द

राज्यात होऊ घातलेल्या विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी अनेक उमेदवारांनी माघार घेतल्याने विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला होता. दरम्यान, विधान परिषद निवडणुकीतून ऐनवेळी माघार घेणाऱ्या उमेदवारांवर काँग्रेसने कठोर कारवाई केली आहे. तसेच उमेदवारी अर्ज मागे घेणाऱ्या दोन उमेदवारांची पक्षातून हकालपट्टी केली आहे.

# माजी खासदार इम्तियाज जलील एसआयटीच्या रडारवर?

## निदा खान प्रकरणात चौकशीसाठी बोलावण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५छत्रपती संभाजी नगर**

राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या टीसीएस लैंगिक छळ आणि धर्मांतर प्रकरणात एक मोठी घडामोड समोर येत आहे. या प्रकरणातील मुख्य फरार आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याप्रकरणी एमआयएम पक्षाचे नगरसेवक मतीन पटेल यांची आत्तापर्यंत विशेष तपास पथकाकडून तीन वेळा कसून चौकशी करण्यात आली आहे. मतीन पटेल यांच्या जप्त केलेल्या मोबाईलमधून मिळालेल्या डेटाच्या आधारे अनेक धक्कादायक खुलासे समोर आले असून, या प्रकरणात आता माजी खासदार इम्तियाज जलील यांना देखील एसआयटीकडून चौकशीसाठी बोलवले जाण्याची शक्यता विश्वसनीय सूत्रांनी वर्तवली आहे.



या संवेदनशील आणि गंभीर गुन्ह्यामध्ये एसआयटीने आत्तापर्यंत एकूण आठ आरोपींना अटक केली असून, त्यांच्याविरुद्ध न्यायालयात मुख्य दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. मोबाईल डेटा आणि तांत्रिक तपासातून समोर आलेल्या नवीन पुराव्यांच्या आधारे, पोलीस येत्या काही दिवसांत न्यायालयात पुरवणी दोषारोपपत्र देखील दाखल करणार आहेत.दुसरीकडे, आरोपी निदा खानला घर मिळवून दिल्याच्या आरोपामुळे अडचणीत आलेल्या मतीन पटेल यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना माजी खासदार इम्तियाज जलील यांचे नाव या प्रकरणात जोडले जात असल्याच्या दाव्यांना पूर्णपणे फेटाळून लावले आहे. निदा खान ही इम्तियाज जलील यांची नातेवाईक असल्याचा आरोप साफ चुकीचा आणि निराधार आहे, असे पटेल यांनी स्पष्ट केले.

# संख्याबळ नाही म्हणून उमेदवारांनी माघार घेतली:मग पैसे घेतल्याचा आरोप कसा करता?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५छत्रपती संभाजीनगर**

संजय राऊत काँग्रेस-राष्ट्रवादीने सहकार्य केले नाही सांगत आहेत, संख्याबळ नसल्याने पराभव होणार हे सांगत आहेत. तरीही उमेदवारांनी माघार घेतली तर त्यांच्यावर पैसे घेतल्याचा आरोप राऊत कसे करू शकतात, असा सवाल शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी केला आहे. संजय शिरसाट म्हणाले की, विधान परिषद निवडणुकीत संख्याबळ नाही त्यामुळे निवडणूक लढवण्यात काही अर्थ नाही हे उबाठाला काही उमेदवारांनी सांगितले पण

### संजय शिरसाट यांचा मविआला सवाल



त्यांनी ऐकलेउ नाही म्हणून उमेदवारांनी माघार घेतली, त्यानंतर उबाठाकडून त्यांच्यावर आरोप करण्यात येत आहेत, यात काही तथ्य नाही हे जनतेला माहिती आहे.

**विधान परिषदेची चिंता करण्याची गरज नाही**

संजय शिरसाट म्हणाले की, नाशिकमध्ये प्रसाद हिरे हे आमच्या उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढवत आहे. आज उदय सामंत आणि गिरीश महाजन हे नाशिहकमध्ये आहेत ते चर्चा करतील. मला वाटते की महायुतीमधील कोणीही बंडखोरी करणार नाही. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी चिंता करण्याची गरज नाही. सर्व १७ पैकी १७ जागांवर महायुतीचेच उमेदवार विजयी होणार आहेत.

संजय शिरसाट म्हणाले की, विधान परिषद निवडणुकीत कोणी माघार घेतली म्हणून त्यांच्यावर पैसे घेतल्याचा आरोप करायचा हे काही बरोबर नाही. निवडणूक लढवतांना कार्यकर्त्यांना साथ द्यायची नाही, पण माघार घेतली तर त्याच्यावर आरोप करायचे हे चुकीचे आहे. आता कार्यकर्ता हुशार झाला आहे, तो घराची राख रांगोळी करत निवडणूक लढवणार नाही. तुम्ही त्याला पाठबळ सुद्धा दिले पाहिजे. विधान परिषद निवडणुकीत मविआची ताकद काय आहे हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे या सर्व जागा महायुतीच जिंकणार आहे.

## संपादकीय ......

# अर्थ, स्वार्थ, सौदेबाजीचा गाढवबाजार !

*महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणूक पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. मात्र ही चर्चा लोकशाही, विचारधारा, जनहित किंवा नेतृत्वाच्या गुणवत्तेभोवती फिरताना दिसत नाही. उलट, या निवडणुकीचा संपूर्ण पट हा अर्थ, स्वार्थ, सौदेबाजी आणि राजकीय व्यवहार यांच्या धाग्यांनी विणलेला असल्याचे चित्र समोर येत आहे. लोकशाहीच्या मंदिरात ज्या प्रक्रियेतून समाजातील सक्षम, अभ्यासू आणि दूरदृष्टी असलेल्या व्यक्तींना संधी मिळायला हवी होती, त्याच प्रक्रियेत आज पैशाच्या बळावर उमेदवारी विकत घेण्याची आणि मतांची खरेदी-विक्री करण्याची स्पर्धा सुरू असल्याचे दिसून येते. विधान परिषद ही भारतीय लोकशाही व्यवस्थेतील एक महत्त्वाची संस्था आहे. विशेषत: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींमार्फत होणार्या निवडणुकांचा उद्देश हा स्थानिक पातळीवर काम करणार्या अनुभवी लोकप्रतिनिधींना राज्याच्या धोरणनिर्मितीत स्थान मिळवून देणे हा होता.*

*ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महापालिकांमधून जनतेच्या प्रश्नांशी थेट संबंध आलेल्या व्यक्तींना राज्याच्या विधिमंडळात प्रवेश मिळावा, हा त्यामागील उदात्त हेतू होता. परंतु आज हा हेतू कोठेतरी हरवून गेला आहे. वास्तविक पाहता, विधान परिषद ही अशा व्यक्तींसाठी असायला हवी होती ज्यांच्यात नेतृत्वाचे गुण आहेत, ज्यांना समाजकारणाची जाण आहे, जे अभ्यासू आहेत; परंतु जातीय समीकरणे, मतदारसंघातील आर्थिक मर्यादा किंवा स्थानिक राजकीय गणितांमुळे त्यांना थेट विधानसभा निवडणुका जिंकणे शक्य होत नाही, अशा लोकांना सार्वजनिक जीवनात योगदान देण्याची संधी देण्यासाठी ही व्यवस्था निर्माण करण्यात आली होती. पण आज परिस्थिती इतकी विकृत झाली आहे की उमेदवारीची पहिली अट नेतृत्व नसून आर्थिक ताकद बनली आहे.*

*अलीकडील निवडणूक प्रक्रियेकडे पाहिले तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ज्याच्याकडे पैसा, त्याच्याकडे संधी. पक्षनिष्ठा, दीर्घकाळ केलेले संघटनात्मक काम, जनाधार किंवा वैचारिक बांधिलकी यांचे मूल्य झपाट्याने कमी होत चालले आहे. अनेक पक्षांमध्ये वर्षानुवर्षे झिजणारे, पक्षासाठी संघर्ष करणारे आणि संकटातही ध्वज खांद्यावर घेऊन उभे राहणारे कार्यकर्ते आज उपेक्षित होताना दिसत आहेत. कारण त्यांच्याकडे कोट्यवधींची रसद नसते. त्यांच्याकडे मतदारांना किंवा निर्णयकर्त्यांना प्रभावित करण्याइतकी आर्थिक क्षमता नसते. परिणामी, विधान परिषदेच्या निवडणुका या विचारांच्या नव्हे तर व्यवहारांच्या निवडणुका बनल्या आहेत. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा राजकीय रंग या निवडणुकीला देण्याचा प्रयत्न होत असला तरी प्रत्यक्षात पडद्यामागे वेगळेच समीकरण काम करत असते. कोणाचा उमेदवार अधिक श्रीमंत आहे, कोणाकडे किती संसाधने आहेत, कोण किती प्रभाव टाकू शकतो आणि कोण किती किंमत मोजू शकतो यावरच निवडणुकीचे गणित उभे राहताना दिसते.*

*यंदाच्या निवडणूक प्रक्रियेदरम्यान उमेदवारी अर्ज भरण्यापासून ते माघारी घेण्यापर्यंत अनेक चर्चा रंगल्या. उमेदवारीसाठी रसद आणि माघारीसाठीही रसद, अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाल्याचे बोलले गेले. अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवसापर्यंत सुरू असलेली हालचाल ही लोकशाही प्रक्रियेपेक्षा एखाद्या शेअर बाजारातील व्यवहारांची आठवण करून देणारी होती. कोण उमेदवारी कायम ठेवणार, कोण माघार घेणार आणि त्यासाठी कोणत्या अटी ठरणार याबाबत सुरू असलेल्या चर्चांनी लोकशाहीच्या प्रतिष्ठेलाच धक्का दिला. 'खोके' आणि 'पेट्या' या सांकेतिक शब्दांनी राज्याच्या राजकारणात एक वेगळाच शब्दकोश निर्माण केला आहे. विरोधक एकमेकांवर आरोप करतात, सौद्यांचे आकडे सांगतात, बंडखोरांना शांत करण्यासाठी किती खोके लागले यावर सार्वजनिक चर्चा होते. ही बाब लोकशाही व्यवस्थेच्या अध:पतनाची साक्ष देणारी आहे. जे व्यवहार पूर्वी बंद दाराआड होत असतील, त्यांच्याविषयी आज उघडपणे बोलले जाते. समाजालाही आता या प्रक्रियेचे आश्चर्य वाटेनासे झाले आहे. हीच सर्वात चिंताजनक बाब आहे.*

*लोकशाहीची खरी ताकद ही मतदारांच्या विश्वासात असते. परंतु जेव्हा मतांची किंमत पैशात मोजली जाते, तेव्हा त्या विश्वासाची पायाभरणीच हादरते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून आलेले प्रतिनिधी हे आपल्या मतदारांचे प्रतिनिधित्व करतात. त्यांचे मत हे जनतेच्या अपेक्षांचे प्रतीक असते. पण जर त्याच मताचे रूपांतर खरेदी-विक्रीच्या वस्तूमध्ये झाले, तर त्यामागे उभ्या असलेल्या लाखो नागरिकांच्या मतांचाही अवमान होतो. दुर्दैवाची बाब म्हणजे या संपूर्ण प्रक्रियेत पक्षप्रमुखांची भूमिकाही प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे. घोडेबाजाराला आळा घालण्याऐवजी अनेकदा त्यालाच अप्रत्यक्ष चालना दिली जात असल्याची भावना निर्माण होते. पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांना न्याय देण्याऐवजी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्तींना प्राधान्य दिले जाते. परिणामी पक्षसंघटनेमध्ये निराशा वाढते.*

*वर्षानुवर्षे मेहनत घेणार्या कार्यकर्त्यांच्या मनात प्रश्न निर्माण होतो की पक्षासाठी संघर्ष करण्याचे नेमके फळ काय? अशा परिस्थितीत राजकारणात येणार्या नव्या पिढीसमोरही चुकीचा संदेश जातो. आज गरज आहे ती या संपूर्ण व्यवस्थेच्या पुनर्विचाराची. स्थानिक स्वराज्य प्राधिकरण मतदारसंघांच्या निवडणुकांमध्ये अधिक पारदर्शकता आणण्याची आवश्यकता आहे. उमेदवार निवड प्रक्रियेत आर्थिक क्षमता नव्हे तर सार्वजनिक योगदान, नेतृत्वगुण, अभ्यास आणि सामाजिक बांधिलकी यांना प्राधान्य दिले पाहिजे. पक्षांनी आपल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच निवडणूक प्रक्रियेत पैशाच्या प्रभावावर कठोर नियंत्रण आणणे ही काळाची गरज आहे. अन्यथा उद्या विधान परिषद ही लोकशाहीतील गुणवंत नेतृत्वासाठी खुला दरवाजा न राहता, पैशांच्या ताकदीवर उघडणारे एक खास प्रवेशद्वार बनून राहील. तो दिवस भारतीय लोकशाहीसाठी निश्चितच चिंतेचा असेल. ज्याच्याकडे अधिक पैसा त्याला संधी मिळते, सत्ता मिळाली की, त्यातून अधिक पैसा मिळवायचा. या सौदेबाजीला आजवर घोडेबाजार म्हटले जात असे, पण आता याला गाढवबाजार म्हणावे लागेल. कारण लोकांना गाढव समजून हा बाजार केला जात आहे.*

# मंदिरांच्या हितरक्षणासाठी अमरावतीत विश्वस्तांचा एल्गार

## देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम रद्द करण्याची मागणी..

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**
मंदिरांच्या हितरक्षणासाठी अमरावती जिल्ह्यातील शेकडो मंदिरांचे विश्वस्त, पदाधिकारी व भक्तगण यांनी एकत्र येत जिल्हाधिकारी तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयात निवेदन सादर केले. मंदिरांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधत मंदिरांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी बोलताना निलेश टवलारे यांनी सांगितले की, मंदिरांना दानरूपाने मिळालेल्या अथवा खरेदी केलेल्या शेतजमिनींचे मूल्यांकन कंपनी किंवा संस्थांप्रमाणे न करता शेती दराप्रमाणे करण्यात यावे. तसेच मंदिरांच्या दान व खरेदी दस्तांसाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे. मंदिरांच्या मालकीच्या शेतीचे नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, गारपीट किंवा दुष्काळामुळे नुकसान झाल्यास सर्वसामान्य शेतकऱ्यांप्रमाणे नुकसानभरपाई व शासकीय मदत मिळावी, अशी मागणीही करण्यात आली. मंदिरांच्या शेतजमिनींना कुळ कायदा व कमाल जमीन धारणा (सिलिंग) कायद्यांतर्गत मिळालेली सूट कायम ठेवावी तसेच विविध प्रकारच्या सूट प्रमाणपत्रांच्या अटी रद्द करण्यात याव्यात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आशिष मारुडकर यांनी मंदिर व तीर्थक्षेत्र विकास निधी खर्च करताना संबंधित मंदिर संस्था, विश्वस्त मंडळे व स्थानिक व्यवस्थापन समितींना विश्वासात घेऊनच निर्णय घ्यावेत, अशी भूमिका मांडली. मंदिर व तीर्थक्षेत्र विकासासाठी निश्चित करण्यात आलेली जागा विकास यंत्रणेकडे हस्तांतरित करण्याची अट रद्द करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

कैलास पनपालिया यांनी राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत



प्रस्तावित करण्यात आलेल्या महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६ या मसुद्याला तीव्र विरोध दर्शविला. मंदिरांच्या जमिनी या समाजाने धर्मकार्यासाठी दान दिलेल्या असून त्या कोणत्याही व्यक्तीच्या खासगी मालकीच्या नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे अशा जमिनींवरील मंदिरांचे हक्क अबाधित ठेवणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.प्रस्तावित अधिनियमामुळे देवस्थान इनाम जमिनींचे अस्तित्व धोक्यात येणार असून अनेक मंदिरांची मालकी व पारंपरिक हक्क संपुष्टात येण्याची भीती व्यक्त करण्यात आली. मंदिरांची आर्थिक व्यवस्था, पूजा-अर्चा, धार्मिक उत्सव आणि सामाजिक उपक्रमांचा प्रमुख आधार असलेल्या या जमिनींचे संरक्षण करण्यासाठी सदर प्रारूप अधिनियम तात्काळ मागे घेऊन रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली.तसेच शासनाने मंदिर विश्वस्त, धार्मिक संस्था व समाजप्रतिनिधींशी व्यापक चर्चा करूनच कोणताही निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही उपस्थितांनी दिला.या प्रसंगी पद्मश्री जनार्दन पंत बोथे, दीपक सब्जीवाले, मीनाताई पाठक, राजेंद्र टेंबे, संजय मेने, योगधर्म हरिनाम प्रभुजी, सुनील काळमेघ, रवींद्र भोयर, विजयराव करडे, अनिल मापले, साहेबरावजी, श्रीकृष्ण मावळे, अतुल ठाकरे, विनोदराव वानखडे, शुभम गुरुदेव सेवा मंडळ, रामकृष्ण लांडोरे, सुरेश वामनराव, शंकरराव येवले, कृष्णाजी मारुडकर, मयूर महंत, गजानन मुदगल, अनिल वानखडे, मोहन इंगळे, वेंकटेश बालाजी ट्रस्टचे प्रतिनिधी, धीरज इंगळे, सोपान करडे, कैलास गिरोलकर, प्रशांत इंगोले, विकास वैद्य, अविनाश देशमुख यांच्यासह अमरावती जिल्ह्यातील विविध मंदिरांचे विश्वस्त, पदाधिकारी, धर्मप्रेमी नागरिक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'माझी वसुंधरा' अभियानाला गती

### प्रत्येक विभाग व नागरिकांना ई-शपथ घेण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून २०२६ रोजी राज्यभर 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार असून नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाची ई-शपथ घ्यावी व पर्यावरण संवर्धनाचा निर्धार करावा, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

या अंतर्गत विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त तसेच विविध विभागांच्या प्रमुखांना 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत विविध जनजागृती उपक्रम आपापल्या जिल्ह्यात राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. वाढते तापमान, पर्यावरणीय बदल आणि नैसर्गिक संसाधनांवरील वाढता ताण लक्षात घेता, पर्यावरण संवर्धनासाठी सर्व स्तरांवर व्यापक जनजागृतीची गरज असल्यामुळे त्यानुसार सर्व मासकीय, निमशासकीय विभागांनी कार्यवाही करावी, सेही सांगण्यात आले आहे.'माझी वसुंधरा' अभियानीच्या माध्यमातून पृथ्वी,जल, वायू, आकाश आणि ऊर्जा या पंचमहाभूतांच्या संवर्धनाचा संदेश देण्यात येणार आहे. यासाठी शासकीय अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन विभागीय आयुक्तांकडून करण्यात आले आहे.नागरिकांनी ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि विविध शासकीय कार्यालयांमध्ये पर्यावरण संवर्धन विषयक चर्चा, जनजागृती कार्यक्रम आणि शपथविधी आयोजित करण्यात र्हीीिं://रक्षहर्ळींर्रीपवहरीर.ळप/ शपत्र्‍ पोर्टलवर जाऊन ई-शपथ घेऊन प्रमाणपत्र प्राप्त करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. यावेत. या पिढ्यांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि संतुलित पर्यावरण पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असून भावी पाडावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे. निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपली भूमिका पार विभागीय आयुक्त कार्यालयाने सर्व संबंधित यंत्रणांना अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करून व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# मोर्शीत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे शहर झाले अत्याधुनिक यंत्रणेने सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मोर्शी** - शहरातील नागरिकांची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच गुन्हेगारी व अवैध कृत्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने मोर्शी नगरपरिषदेकडून शहरात अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात आला आहे. नगराध्यक्ष प्रतीक्षा रवींद्र गुल्हाने यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमामुळे मोर्शी शहर आता अत्याधुनिक सुरक्षायंत्रणेने सज्ज झाले आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ, जयस्तंभ चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच विविध संवेदनशील आणि वर्दळीच्या ठिकाणी उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून शहरातील हालचालींवर चोवीस तास लक्ष ठेवणे शक्य होणार असून संशयास्पद व्यक्ती, अवैध वाहतूक, चोरी, भांडणे, अपघात आणि इतर अनुचित घटनांवर नियंत्रण ठेवण्यास



बळकट झाली आहे. सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून शहरातील गुन्हे उघडकीस आणणे, वाहतूक व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित माहिती उपलब्ध होणे शक्य होणार आहे. तसेच पोलिस प्रशासनालाही तपासकार्यात मोठी मदत मिळणार आहे. वाढत्या शहरीकरणासोबतच नागरिकांच्या सुरक्षेचे आव्हानही वाढत आहे. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने यांनी पुढाकार घेत शहरासाठी आधुनिक सुरक्षाव्यवस्थेची गरज ओळखून हा उपक्रम प्रत्यक्षात आणला. त्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून महिलांमध्ये, ज्येष्ठ नागरिकांमध्ये तसेच व्यापारी वर्गामध्ये सुरक्षिततेची भावना अधिक मदत मिळणार असल्याचे नागरिकांचे मत आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त करीत नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अशाच लोकहिताच्या योजना राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. सुरक्षित मोर्शी, स्मार्ट मोर्शी, या संकल्पनेला बळ देणारा हा सीसीटीव्ही प्रकल्प शहरासाठी एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीचा निर्णय ठरत आहे.

# नदीकाठी हातभट्टी दारूअड्ड्यावर पोलिसांचा छापा

## यूरिया व नवसागरासह ४८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ५धा.रेल्वे** - अमरावती ग्रामीण पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्या 'झिरो टॉलरन्स' मोहिमेंतर्गत तळेगाव दशासर पोलिसांनी बेलोरा शिवारातील बेंबळा नदीकाठी सुरू असलेल्या अवैध हातभट्टी दारू अड्ड्यावर धाड टाकून एका महिलेला रंगेहात अटक केली. या कारवाईत ४८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तीन जून रोजी सकाळी तळेगाव दशासर पोलिस ठाण्याचे पथक हद्दीत गस्त घालत असताना बेलोरा शिवारातील बेंबळा नदीच्या काठावर बेकायदेशीररीत्या हातभट्टीची दारू तयार केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी छापा टाकला. छाप्यादरम्यान प्रत्यक्ष हातभट्टीची दारू तयार करताना एक महिला आढळून आली. पोलिसांनी तिला ताब्यात घेत घटनास्थळावरून ११ लिटर तयार हातभट्टी दारू, २१० लिटर मोहाचा सडवा, आठ किलो यूरिया, एक किलो नवसागर तसेच दारू गाळण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य



व भांडी, असा एकूण ४८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

तपासादरम्यान जप्त करण्यात आलेल्या यूरिया आणि नवसागरचा वापर दारूची तीव्रता व नशा वाढविण्यासाठी केला जात असल्याचे समोर आले आहे. ही रासायनिक द्रव्ये मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक असून अशाप्रकारे तयार केलेली दारू पिणाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. पोलिसांच्या या कारवाईमुळे संभाव्य दुर्घटना टळल्याचे मानले जात आहे. ही कारवाई अमरावती ग्रामीणचे पोलिस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड, चांदूररेल्वेचे उपविभागीय पोलिस अधिकारी अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत तळेगाव दशासरचे ठाणेदार किरण औटे तसेच पोलिस कर्मचारी पवन अलोणे, सचिन गायधने, कांचन दहाटे, पंकज शेंडे, मनीष कांबळे आणि गौतम गवळे यांनी सहभाग घेतला. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, परिसरात कुठेही अवैध धंदे सुरू असल्याची माहिती मिळाल्यास ती तातडीने पोलिसांना कळवावी.

# शेंदूरजनाघाट येथे 'श्री विजय' ग्रंथाचे महापारायण

### भाविकांची प्रचंड गर्दी, सुरभी ढगेच्या मुखोद्गत पारायणाने गजानन भक्त मंत्रमुग्ध





**विदर्भ प्रजासत्ताक दि.५शेंदूरजनाघाट** -ज्येष्ठ अधिक मासानिमित्त श्री हनुमान मंदिर, वाई रोड, मलकापूर येथील श्रीसंत गजानन महाराज मंदिर तसेच श्रीसंत गजानन महाराज भक्त परिवार, शेंदूरजनाघाटच्या वतीने ३१ मे रोजी श्री केदारेश्वर देवस्थान येथे सामूहिक मुखोद्गत महापारायणाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात अवघ्या ११ वर्षीय सुरभी सुनील ढगे (रा. पुणे) हिने केलेल्या 'श्री विजय' ग्रंथाच्या मुखोद्गत पारायणाने उपस्थित गजानन भक्त मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाची सुरवात ३१ मे रोजी सकाळी सहा वाजता 'श्रीं'च्या मुखवट्याच्या अभिषेकाने झाली. त्यानंतर सकाळी सात वाजता शिक्षक कॉलनी येथील प्रा. राजू सरोदे यांच्या निवासस्थानापासून सुरभी ढगे यांची रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. श्रीदत्त महाराज दिंडी, महिला मंडळ तसेच गजानन भक्तांच्या सहभागाने 'गण गण गणात बोते'च्या जयघोषात ही मिरवणूक पारायणस्थळ असलेल्या श्री केदारेश्वर देवस्थान, तिवसाघाट रोडअयेथे पोहोचली. पारायणस्थळी सुरभी ढगे यांचे स्वागत करण्यात आल्यानंतर सकाळी आठ वाजता पारायणाला सुरवात झाली. सुरभी हिने आपल्या मधुर वाणीतून श्री विजय' ग्रंथाच्या २१ अध्यायांचे मुखोद्गत पारायण सादर केले. तिच्या अचूक स्मरणशक्ती आणि प्रभावी सादरीकरणाने उपस्थित भाविक भारावून गेले. या पारायण सोहळ्यास तीनशेहून अधिक महिला-पुरुष गजानन भक्त उपस्थित होते. पारायणानंतर 'श्रीं'ची आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित गजानन भक्त आणि परिसरातील नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीसंत गजानन महाराज भक्त परिवार, शेंदूरजनाघाट यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेत गैरप्रकार

### चौकशी करण्याची नगरसेविकेचे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५चांदुर बाजार**
चांदूरबाजार शहरात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या नावावर अनियमितता व फसवणूक होत असल्याची तक्रार समोर आली आहे. त्यामुळे याप्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी नगरपरिषद चांदूरबाजारच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती तथा नगरसेविका कल्याणी हेमंत कोंडे यांनी ठाणेदारांकडे केली आहे. निवेदनात मध्य प्रदेशातील एका गॅस कंपनीच्या माध्यमातून काही लाभार्थ्यांच्या नावावर योजनेचा लाभ देताना नियमबाह्य प्रकार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच काही लाभार्थ्यांना योजनेचा लाभ योग्यप्रकारे मिळत नसून लाभ मंजुरी प्रक्रियेत अनियमितता, लाभार्थ्यांची दिशाभूल, अतिरिक्त रकमेची मागणी तसेच



कागदपत्रांचा गैरवापर होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ही बाब शासनाच्या जनकल्याणकारी योजनेशी संबंधित असून गरीब व गरजू कुटुंबांच्या हिताशी निगडित असल्याने प्रकरणाची निष्पक्ष, सखोल व तत्काळ चौकशी करण्यात यावी, अशी मागणी कल्याणी कोंडे यांनी केली आहे. चौकशीत दोषी अधिकारी, वितरक अथवा संबंधित व्यक्ती आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. याशिवाय लाभार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी करून योजनेचा लाभ नियमांनुसार मिळत आहे की नाही, याची तपासणी करून सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून द्यावा, असेही निवेदनात म्हटले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# जिल्ह्यातील ४८२ गावांना पुराचा संभाव्य धोका

## मान्सूनपूर्व कामांसाठी जिल्हा प्रशासन सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** अमरावती जिल्ह्यातील ४८२ गावांना संभाव्य पुराचा धोका असून, त्यापैकी सुमारे ३०० गावे अतिसंवेदनशील मानली जातात. पावसाळ्यात पूरपरिस्थिती उद्भवल्यास होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विशेष सतर्कता बाळगली जाते आणि आपत्ती व्यवस्थापन पथके १६८ हून सक्रिय केली आहे. तसेच संपूर्ण यंत्रणा सज्ज असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांनी दिली.जिल्ह्यात १४ तालुक्यांतील ४८२ गावांना संभाव्य पुराचा धोका आहे. आगामी ७ जूनपासून मान्सून सक्रिय होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात आपत्तीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी, तसेच नागरिकांच्या बचावासाठी दरवर्षी जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाद्वारे उपाययोजना केल्या जातात, अतिवृष्टीमुळे नदी, नाल्यांना पुर येऊन गावांना, नागरिकांना होणारा धोकाटाळण्या साठी, तसेच यापासून त्यांचा बचाव करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाने पूर्व नियोजन केले आहे. सन २००७ च्या सर्वेनुसार जिल्ह्यात ४८२ गावांना संभाव्य पुराचा धोका उद्भवू शकतो. त्यामुळे या गावांकडे आपत्ती विभागाने लक्ष केंद्रित केलेआहे. यातील २११ गावांना मोठ्या नद्यांमुळे धोका आहे, तर ३०२ गावे लहान नाले नद्यांमुळे २७१ गावे प्रभावित होतात. तसेच अशी परिस्थिती उद्भवल्यास त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून ६८६ तात्पुरत्या निवाऱ्यांची व्यवस्था केली आहे. यागावांमधील संभाव्य लोकसंख्या ५ लाख असून त्यापैकी १९२८ पोहणाऱ्यांची संख्या आहे.



### प्रशासनाला सूचना

नदी काठावर येणाऱ्या गावांना पुराच्या पाण्याच्या धोकादायक ठिकाणी सिमांकन करणे. पूर रेषा नदी नाल्याचे पात्रातील अनधिकृत, रहिवासी यांना नोटीस देणे, धरणातील पाणी सोडताना नदीकाठावरील सर्व गावांना, संबधित तहसिलदार, पोलीस स्टेशन अधिकारी, तालुका, जिल्हा नियंत्रण कक्ष यांना किमान २४ तास अगोदर कळविणे, मोठे मध्यम प्रकल्प तसेच जिल्ह्यातील सर्वच प्रकल्पाची तातडीची दुरूस्ती करावी, प्रकल्पांच्या दरवाजांची दुरूस्ती करावी. नैसर्गिक पाणी साठे, प्रकल्पाचे कालवे व सांडवे दुरूस्ती, प्रकल्पावरील बिनतारी यंत्रणेची सज्जता ठेवावी. यासारख्या सूचना देण्यात आल्या आहे.-

# आयुक्त वर्षा लड्डा यांची आरोग्य केंद्रे व शाळांची पाहणी

## सुविधा अधिक सक्षम करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त वर्षा लड्डा यांनी आज सकाळी वडाळी येथील शहरी आरोग्य केंद्र, महानगरपालिका शाळा तसेच टी.बी. हॉस्पिटल मागील शहरी आरोग्य केंद्र व शाळेची पाहणी करून आरोग्य व शैक्षणिक सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.पाहणीदरम्यान आयुक्तांनी आरोग्य केंद्रांमधील रुग्णसेवा, औषध साठा, मातृ व बाल आरोग्य सेवा, लसीकरण कार्यक्रम, स्वच्छता व्यवस्था, कर्मचारी उपस्थिती आणि विविध राष्ट्रीय आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. रुग्णांना वेळेवर व प्रभावी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासोबतच केंद्रांमध्ये स्वच्छता व देखभालीवर विशेष भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले.वडाळी येथील महानगरपालिका शाळेच्या पाहणीवेळी सुरू असलेल्या नवीन इमारत बांधकामाचा आढावा घेत उच्च दर्जाचे व आधुनिक सुविधांनी सुसज्ज शैक्षणिक संकुल उभारण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी योग्य नियोजन करण्याच्या सूचना शिक्षक व शिक्षण विभागाला करण्यात आल्या.टी.बी. हॉस्पिटल मागील शहरी आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अतिरिक्त कक्षाची मागणी केल्यानंतर संबंधित बांधकाम विभागाला आवश्यक रूमची व्यवस्था करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. तसेच आरोग्य केंद्र परिसरात शौचालय बांधकाम करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी आरोग्य आणि शिक्षण हे नागरी विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ असल्याचे सांगत नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेची प्राथमिकता असल्याचे स्पष्ट केले. सर्व आरोग्य केंद्रे व शाळांमध्ये सेवा गुणवत्ता, स्वच्छता आणि आवश्यक सुविधा कायम राखण्यासाठी नियमित पाहणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.पाहणी दौऱ्यात उपायुक्त योगेश पिठे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, भुषण पुसतकर, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, कार्यकारी अभियंता सुहास चव्हाण, उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, मालमत्ता अधिकारी सचिन मांडवे, उपअभियंता शरद तिनखेडे, लक्ष्मण पावडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.स्वाती कोवे, डॉ.पोर्णिमा उघडे, डॉ.हिवराळे, शाळा निरीक्षक योगेश पखाले, केंद्र समन्वयक अनुप भारंबे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, आरोग्य अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# अमरावती मनपाची धडक कारवाई

## ३६.४५ लाखांच्या थकबाकीसाठी

# दोन मालमत्ता सील

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५अमरावती -** अमरावती महानगर पालिकेने मालमत्ता कर थकबाकीदारांविरोधात सुरू केलेल्या विशेष वसुली मोहिमेत गुरुवारी मोठी कारवाई करत दोन मालमत्ता सील केल्या. आयुक्त वर्षा लड्डा यांच्या निर्देशानुसार मध्य झोन क्र. २ अंतर्गत राजापेठ विभागात ही कारवाई करण्यात आली.मनपाच्या माहितीनुसार, वार्ड क्र. बी-६ मधील मालमत्ता क्रमांक ८०७ व ८०७-१ वर ६ लाख १६ हजार १५ रुपयांची थकबाकी होती. वारंवार नोटिसा व पाठपुरावा करूनही कराचा भरणा न केल्याने संबंधित मालमत्ता सील करण्यात आली. तसेच त्याच वार्डातील मालमत्ता क्रमांक ३१-१० वर ३० लाख २९ हजार १२८ रुपयांची थकबाकी होती. मुदत देऊनही कर न भरल्याने या मालमत्तेवरही सीलिंगची कारवाई करण्यात आली.दोन्ही मालमत्तांवरील एकूण थकबाकी ३६ लाख ४५ हजार १४३ रुपये आहे. सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाच्या पथकाने नियमानुसार ही कारवाई केली. यावेळी नर्मदा चव्हाण, फैयाज खान, सुरज चावरे, रोशन चव्हाण, धरम बिवाड आणि विशाल डीख्याव उपस्थित होते.मनपाने स्पष्ट केले की मालमत्ता कर हा शहराच्या विकासासाठी महत्त्वाचा महसूल स्रोत असून, थकबाकीदारांनी तातडीने कर भरावा. अन्यथा सीलिंग, जप्ती आणि इतर कठोर कारवाया पुढेही सुरू राहतील.





# 'त्या' कृषीपंपाचे वीजबिल भरणे बंधनकारक

## मुख्य अभियंता अशोक साळुंके यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**

अश्वशक्तीपेक्षा जास्त क्षमता असलेल्या कृषीपंपाचे वीजबिल भरणे बंधनकारक असून महावितरणच्या अमरावती परिमंडळांतर्गत या प्रवर्गात मोडणाऱ्या सहा हजार २७८ कृषीपंप ग्राहकाकडे २२० कोटी ७९ लाख रुपयाचे वीजबिल थकीत आहे. बील न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याचे निर्देश क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले असून, थकबाकी असलेल्या कृषीपंप वीज ग्राहकांनी थकीत बिल भरून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे. महावितरणने स्पष्ट केले आहे की, बळीराजा मोफत वीज योजना ही सर्व कृषीपंपधारकांसाठी लागू नसून केवळ ७.५ एचपीपेक्षा कमी क्षमतेच्या कृषीपंपांसाठीच लागू आहे. या योजनेंतर्गत शासनाने २०२४ ते मार्च २०२९ या कालावधीत अशा पंपांचे चालू वीजबिल शून्य केले आहे. मात्र ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या कृषीपंपधारकांना वीजबिल भरणे बंधनकारक असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबविली जात आहे. या योजनेंतर्गत विकेंद्रित स्वरूपातील सौर प्रकल्प उभारणी, फीडर विलगीकरण, नवीन वीजवाहिन्या, रोहित्रे आणि उपकेंद्र उभारणीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. परिमंडळातील सुमारे दोन लाख ८० हजार शेतकऱ्यांपैकी जवळपास ७० टक्क्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्याचा लाभ देण्यात येत असून पुढील काही महिन्यात शंभर टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देणे शक्य होणार आहे. परिमंडळातील ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या एकूण सहा हजार २७८ कृषीपंपधारक शेतकऱ्यांकडे २२० कोटी ७९ लाख रुपयांची थकबाकी आहे. यापैकी अमरावती जिल्ह्यातील चार हजार २०८ शेतकऱ्यांकडे ११६ कोटी ३३ लाख रुपयांची थकबाकी आहे.



# ११७ नव्हे, तब्बल २२७ ग्रॅम सोने लंपास ?

## मांजरखेड (दानापूर) येथील घरफोडी प्रकरणात नवा ट्विस्ट

### एफआयआरमध्ये चोरीच्या सोन्याचे प्रमाण वाढविण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५चांदूर रेल्वे** चांदूर रेल्वे तालुक्यातील मांजरखेड (दानापूर) येथे घडलेल्या धाडसी घरफोडी प्रकरणात आता नवे वळण आले असून, सुरुवातीला पोलिसांकडे ११७.६८ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरीस गेल्याची नोंद करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात तब्बल २२७ ग्रॅम सोने चोरीला गेले असल्याचा दावा फिर्यादी महिलेने केला असून, त्याबाबत एफआयआरमध्ये वाढीव नोंद करण्यात यावी, अशी मागणी तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मांजरखेड (दानापूर) येथील रहिवासी विमल वामनराव ठाकरे (वय ६०) या २९ मे रोजी आपल्या कुटुंबीयांसह लग्नकार्यासाठी बाहेरगावी गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी २९ ते ३१ मे दरम्यान त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटाचे लॉकर फोडून त्यामध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने चोरून नेण्यात आले. ३१ मे रोजी ठाकरे कुटुंब घरी परतल्यानंतर घराचे कुलूप तुटलेले आणि घरातील सामान अस्ताव्यस्त अवस्थेत आढळून आले. त्यानंतर त्यांनी तळेगाव दशासर पोलिसांत तक्रार दाखल केली. सुरुवातीला ११७.६८ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची नोंद करण्यात आली होती. मात्र पुढील पडताळणीदरम्यान चोरीस गेलेल्या दागिन्यांचे वजन २२७ ग्रॅम इतके असल्याचे निदर्शनास आल्याने, फिर्यादीने त्याबाबत पोलिसांकडे लेखी निवेदन सादर करून गुन्ह्यात वाढीव नोंद करण्याची मागणी केली आहे.



### आजच्या बाजारभावानुसार तब्बल ३४ लाखांचे नुकसान?

फिर्यादीच्या दाव्यानुसार चोरीला गेलेल्या २२७ ग्रॅम सोन्याची किंमत आजच्या बाजारभावानुसार सुमारे ३४ लाख रुपयांच्या घरात पोहोचत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या घरफोडीचे गांभीर्य आणखी वाढले असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

# १८ जूनला ४५३ मतदार करणार मतदान

### सात मतदान केंद्र, २२ जूनला होणार मतमोजणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती-** विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात येत्या १८ जूनला मतदान होणार असून जिल्ह्यातील ४५३ मतदार त्यासाठी मतदान करणार आहेत. या निवडणुकीत गैरप्रकार होऊ नये, यासाठी विशेष दक्षता घेण्यात येत असून मतदान सात केंद्रांवरून करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. या निवडणुकीत पसंतीक्रमाने मतदान करण्यात येणार असून ते कशा पद्धतीने करायचे, याच्या सूचना मतदारांना देण्यात आल्या असल्याची माहिती त्यांनी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम व सहायक पोलिस आयुक्त रमेश धुमाळ उपस्थित होते. ते म्हणाले, निवडणुकीच्या रिंगणातून अपक्ष उमेदवार प्रशांत महल्ले यांनी माघार घेतली असल्याने या रिंगणात आता भाजपचे प्रवीण पोटे, काँग्रेसचे हर्षजित देशमुख व वंचितचे नीलेश विश्वकर्मा हे तीन उमेदवार आहेत. अमरावती जिल्ह्यातील ४५३ मतदार असून त्यामध्ये २२७ महिला व २२६ पुरुष मतदार आहेत. मतदानाकरिता उपविभाग स्तरावर एकूण सात मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. धारणी तहसील कार्यालय, अचलपूर उपविभागीय कार्यालय, मोर्शी तहसील कार्यालय, दर्यापूर तहसील कार्यालय, तिवसा-भातकुली (कॅम्प रोड उपविभागीय कार्यालय), अमरावती नवीन तहसील तालुका प्रशासकीय इमारत व चांदूररेल्वे तहसील कार्यालय येथे हे मतदान केंद्र आहेत. ४२ जणांची नियुक्ती निवडणुकीकरिता उपविभाग स्तरावर प्रत्येक मतदानकेंद्रासाठी सात अधिकारी व कर्मचारी, असे एकूण ४२ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक मतदानकेंद्रावर पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. मतपेट्या नियोजन भवनात १८ जूनला मतदान आटोपल्यानंतर मतपेट्या नियोजन भवन येथील सुरक्षाकक्षामध्ये ठेवण्यात येणार आहेत. २२ जूनला मतमोजणी करण्यात येणार असून त्याकरिता दोन टेबल निश्चित करण्यात आले आहेत. एक टेबल संकलनासाठी ठेवण्यात आलेला असल्याचेही जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सांगितले.




# तीन महिन्यांचे धान्यवाटप रखडले

### मशीनमधील तांत्रिक बिघाड, प्रशासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती -** राज्य शासनाने एप्रिल, मे व जून २०२६ या तीन महिन्यांच्या धान्यवाटपाचे आदेश दिले असले तरी प्रत्यक्षात धान्य वितरण प्रक्रिया मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली आहे. एप्रिल महिन्याचे धान्य मे महिन्यात वितरित होण्यास सुरवात झाली, मात्र एक मेपासून तर जूनपर्यंत अनेक ठिकाणी धान्य वितरणासाठी वापरण्यात येणारी ई-पॉस (थम्ब) मशीन बंद पडल्याने वितरणात दिरंगाई झाली. परिणामी अनेक लाभार्थी आजही धान्यापासून वंचित आहेत.सध्या जिल्ह्यात तीव्र तापमान असताना गोरगरीब नागरिकांना आपली मजुरी सोडून धान्याच्या रांगेत तासन् तास उभे राहावे लागत आहे. अनेक ठिकाणी स्वस्त धान्य दुकानांबाहेर नागरिकांची मोठी गर्दी होत असून त्यांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

धान्य दुकानदारांच्या मते, मशीनमध्ये वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. तसेच तीन महिन्यांच्या धान्याचा पूर्ण पुरवठा उपलब्ध नसल्याने वितरण प्रक्रियेत अडथळे येत आहेत. त्यामुळे स्वस्त धान्य दुकानदारांची मोठी धावपळ होत असून त्यांनाही मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या परिस्थितीत लाभार्थी आणि दुकानदार यांच्यात वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

लाभार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या तीन महिन्यांपासून नियमित धान्य मिळत नसल्याने अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येत आहे. शासनाने नियमित धान्य पुरवठा सुनिश्चित करावा तसेच एप्रिल, मे आणि जून महिन्याचा संपूर्ण डेटा मशीनमध्ये तातडीने समाविष्ट करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. यासंदर्भात प्रशासनाने स्पष्ट भूमिका घेऊन तत्काळ निर्णय घ्यावा, जेणेकरून ग्राहकांना कोणत्याही प्रकारचा नाहक त्रास सहन करावा लागणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



सरकारकडून नियमित धान्यपुरवठा होत नसल्याने आणि धान्य वितरण मशीनमध्ये वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने ग्राहकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. प्रशासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन वितरण व्यवस्था सुरळीत करावी.

**-अरुण भालेराव** तालुकाध्यक्ष, सरकारी स्वस्त धान्य दुकानदार संघटना, अमरावती.

# जिल्ह्यात पावणेतीन लाख थकबाकीदार शेतकरी

## कर्जमाफीच्या यादीत पात्र किती ठरणार, पडताळणी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत जिल्ह्यातील किती शेतकरी पात्र ठरणार, याबाबतची पडताळणी आता जिल्हास्तरावर सुरू झाली आहे. शासनाकडून प्राप्त प्राथमिक अहवालानुसार जिल्ह्यात तब्बल दोन लाख ७५ हजार २९२ शेतकरी थकबाकीदार शेतकरी असून त्यांच्याकडे तीन हजार १३७ कोटी ४ लाख ५७ हजार रुपये इतके पीककर्ज थकीत आहे. त्यामुळे या लाखो शेतकर्यांपैकी नेमका किती शेतकर्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्य शासनाच्या निर्णयानुसार ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या पात्र अल्पमुदत पीककर्जांना कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणार्या शेतकर्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यासाठी जिल्हास्तरावर पात्र व अपात्र लाभार्थ्यांची छाननी सुरू करण्यात आली असून संबंधित बँकांकडून माहिती संकलित केली जात आहे. जिल्हा प्रशासनाच्या आकडेवारीनुसार अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ७३ हजार १२५ थकीत कर्जदार असून त्यांच्याकडे ७९८ कोटी ३१ लाख ५९ हजार रुपये इतके पीककर्ज थकीत आहे. तर राष्ट्रीयीकृत व इतर बँकांमधील दोन लाख दोन हजार १६७ शेतकरी थकबाकीदार आहेत. त्यांच्याकडे दोन हजार ३३८ कोटी ७२ लाख ९८ हजार रुपये इतकी थकबाकी आहे. शासनाने घालून दिलेल्या निकषांनुसार शेतकर्यांना लाभ मिळणारआहे. आधार प्रमाणीकरण, ग्रीस्टॅक नोंदणी, कर्जाचा प्रकार, थकबाकीची स्थिती तसेच इतर अटींची पूर्तता करणार्या शेतकर्यांनाच योजनेचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे अंतिम लाभार्थी संख्या पडताळणीनंतरच स्पष्ट होणार आहे.



थकबाकीदार शेतकरी संख्या

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक : ७३, १२५ ( ७९८.३१ कोटी)

राष्ट्रीय, खासगी व इतर बँका : २, ०२, १६७ ( २३३८.७२ कोटी) (थकीत रक्कम)


# पेढी नदी पुलावर भीषण अपघात

# विटांनी भरलेला ट्रक पुलाखाली कोसळला

# एक जागीच ठार, दोन गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती –**
जिल्ह्यातील परतवाडा-चांदूरबाजार मार्गावरील पेढी नदी पुलावर गुरुवारी भीषण अपघात घडला. विटांनी भरलेला एक ट्रक पुलावरील सुरक्षा कठडा तोडून थेट नदीपात्रात कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

या दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.प्राप्त माहितीनुसार, विटांची वाहतूक करणारा ट्रक परतवाडा-चांदूरबाजार मार्गावरून जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.





वेगात असलेल्या ट्रकने पुलावरील सुरक्षा रेलिंगला जोरदार धडक दिली आणि त्यानंतर तो थेट पुलाखाली कोसळला. अपघाताचा आवाज इतका मोठा होता की परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले.घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन, आपत्कालीन बचाव पथक, रुग्णवाहिका सेवा तसेच जेसीबी मशीनसह संबंधित विभागांचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. ट्रकखाली काही जण अडकल्याची प्राथमिक माहिती मिळाल्याने बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले.

बचाव पथकाने मोठ्या प्रयत्नांनंतर जखमींना बाहेर काढून तातडीने रुग्णालयात हलविले. प्राथमिक माहितीनुसार, अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे काम सुरू असून अपघातग्रस्तांच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहेत.दरम्यान, ट्रकखाली आणखी कोणी अडकले होते का, याबाबतही तपास सुरू आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी वाहनाचा वेग, तांत्रिक बिघाड किंवा चालकाचे नियंत्रण सुटणे यांसारख्या बाबींचा तपास केला जात आहे.

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील चौकशी सुरू केली आहे.या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पेडी नदी पुलावरील सुरक्षेचा मुद्दाही पुन्हा ऐरणीवर आला आहे. स्थानिक नागरिकांनी या मार्गावरील वाहतूक सुरक्षेबाबत प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# कर वसुलीबाबत राजकारण नको; शहर विकासासाठी मालमत्ता धारकांनी कर भरावा

## महानगरपालिका सभागृह नेते चेतन गावंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती,** शहरातील मालमत्ता कर वसुलीबाबत काँग्रेस पक्षाने केलेले वक्तव्य हे पूर्णपणे राजकीय हेतूने प्रेरित असून नागरिकांची दिशाभूल करणारे आहे. अमरावती महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सक्षम ठेवण्यासाठी मालमत्ता कर व इतर करांची वसुली करणे ही प्रशासनाची कायदेशीर व आवश्यक जबाबदारी आहे. त्यामुळे कोणत्याही नागरिकाने अथवा करधारकाने अशा राजकीय आवाहनांना बळी न पडता नियमितपणे कर भरावा, असे आवाहन अमरावती महानगरपालिका सभागृह नेता तथा माजी महापौर चेतन गावंडे यांनी केले आहे.



गावंडे म्हणाले की, शहराच्या विकासासाठी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, स्ट्रीट लाईट, उद्याने, आरोग्य सेवा आदी मूलभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असते. हा निधी प्रामुख्याने मालमत्ता कराच्या माध्यमातून उपलब्ध होत असतो. त्यामुळे कर भरणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून शहराच्या विकासासाठी त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

महानगरपालिका प्रशासनाने थकबाकीदारांकडून कर वसुलीसाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होऊ नये, परंतु मोठे थकबाकीदार, व्यावसायिक प्रतिष्ठाने, शासकीय संस्था आणि इतर कर थकविणाऱ्यांवरही कठोर कारवाई झाली पाहिजे. कायद्यापुढे सर्व समान आहेत. कोणालाही राजकीय संरक्षण मिळू नये. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती मजबूत झाल्याशिवाय नागरिकांना अपेक्षित सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत.

त्यामुळे कर भरणाऱ्या प्रामाणिक नागरिकांचा सन्मान राखत थकबाकीदारांकडून महसूल वसूल करणे ही काळाची गरज आहे.या मोहिमेमध्ये सर्व प्रकारच्या थकबाकीदारांवर नियमानुसार कार्यवाही केली जात आहे. कोणालाही वेगळा न्याय दिला जात नाही.

कर वसुली ही कायद्याच्या चौकटीत राहून पारदर्शक पद्धतीने केली जात असून यामध्ये राजकारण आणणे योग्य नाही.अमरावतीकर नागरिकांनी कोणत्याही अफवा किंवा राजकीय वक्तव्यांवर विश्वास न ठेवता आपल्या मालमत्तेचा कर वेळेत भरून महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन चेतन गावंडे यांनी केले आहे. तसेच कर वसुलीमधून प्राप्त होणारा निधी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, नागरिकांच्या सुविधा वाढविण्यासाठी आणि अमरावतीला अधिक सक्षम व विकसित शहर बनविण्यासाठी उपयोगात आणला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.-

## सार्वजनिक वाहतुकीत महिला व मुलांच्या सुरक्षेसाठी सुप्रीम कोर्टाचा ऐतिहासिक निर्णय

# वाहनांत पॅनिक बटण अनिवार्य, अन्यथा लायसेन्स रद्द होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती-**
देशातील सार्वजनिक वाहतुकीत प्रवास करणाऱ्या महिला, मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. टॅक्सी, बस, कॅब आणि इतर सार्वजनिक सेवा वाहनांमध्ये वाहन लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस (तड्ढऊ) तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी पॅनिक बटण बसविण्याच्या नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत.न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, १ जानेवारी २०१९ नंतर नोंदणी झालेल्या सार्वजनिक सेवा वाहनांमध्ये ही यंत्रणा अनिवार्य आहे. तसेच या उपकरणांची पडताळणी झाल्याशिवाय कोणत्याही वाहनाला फिटनेस प्रमाणपत्र किंवा वाहतूक परवाना (परमिट) देऊ नये, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.डउउ जपश्रळपश



+१वाहनांमध्ये बसविण्यात येणारे व्हीएलटीडी वाहनाचे रिअल-टाइम लोकेशन नियंत्रण कक्षापर्यंत पोहोचवते, तर पॅनिक बटणाद्वारे प्रवासी संकटाच्या वेळी तात्काळ मदतीसाठी अलर्ट पाठवू शकतात. त्यामुळे महिला, मुले आणि इतर प्रवाशांवरील अत्याचार, छेडछाड किंवा गुन्हेगारी प्रकार रोखण्यासाठी ही यंत्रणा प्रभावी ठरणार असल्याचे मानले जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना जुन्या सार्वजनिक सेवा वाहनांमध्येही ही उपकरणे बसविण्याची प्रक्रिया वेळबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. सध्या देशातील अत्यल्प सार्वजनिक वाहतूक वाहनांमध्येच ही यंत्रणा कार्यरत असल्याबद्दल न्यायालयाने चिंता व्यक्त केली.या निर्णयामुळे सार्वजनिक वाहतुकीतील सुरक्षाव्यवस्थेला मोठी चालना मिळणार असून, विशेषतः महिला व मुलांच्या सुरक्षित प्रवासासाठी हा निर्णय 'गेमचेंजर' ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वाहनधारकांनी नियमांचे पालन न केल्यास त्यांना फिटनेस प्रमाणपत्र किंवा परमिट नाकारले जाऊ शकते. त्यामुळे आता सर्व व्यावसायिक वाहनधारकांसाठी व्हीएलटीडी आणि पॅनिक बटण बसविणे बंधनकारक झाले आहे.-

# सोयाबीन विमा परतावा तातडीने द्या

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना भारतरत्नचा सन्मान द्या

## - गुरुदेव भक्तांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ तिवसा** तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पीक विम्याचा परतावा तातडीने देण्यात यावा तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी तिवसा येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या नावे निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन तहसीलदार, तिवसा यांच्या मार्फत जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे पाठविण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खरीप हंगाम २०२५-२६ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे तिवसा तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पिकांचे उत्पन्न घटल्याने अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाच्या पीक विमा योजनेत सहभागी होऊनही अनेक पात्र शेतकऱ्यांना अद्याप विमा परतावा मिळालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त आणि पात्र शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपयांप्रमाणे आर्थिक मदत देण्यात यावी तसेच प्रलंबित पीक विम्याची रक्कम तातडीने त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने त्वरित हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.यासोबतच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्याचा गौरव करण्याची



मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामविकास, समाजप्रबोधन, राष्ट्रनिर्माण आणि स्वातंत्र्य चळवळीत दिलेले योगदान अतुलनीय असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आपल्या कीर्तन, प्रवचन आणि विचारांच्या माध्यमातून त्यांनी समाजात जागृती निर्माण केली. ग्रामीण विकासाचा संदेश देत त्यांनी देशहितासाठी मोलाचे कार्य केले. त्यांच्या या योगदानाचा सन्मान म्हणून त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.दरम्यान, हे निवेदन सादर करताना गुरुदेव भक्त आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हजारोच्या संख्येने सहभागी झालेल्या नागरिकांनी दोन्ही मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. या आंदोलनात्मक निवेदनामुळे तालुक्यातील शेतकरी आणि गुरुदेव भक्तांच्या भावना शासनापर्यंत पोहोचल्याचे बोलले जात आहे.

# फंड उपलब्ध नसतानाही रस्ता बांधकामाचा सपाटा

## कंत्राटदारांच्या वर्चस्वाच्या लढाईत कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**
सध्या गावखात्यातील अंतर्गत ठिकाणी सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचे काम मंजूर झाले. मात्र त्यावर फंड उपलब्ध नसतानाही कंत्राटदारांच्या वर्चस्वाच्या लढाईत रस्ताबांधकामाचा सपाटा सुरू झाला आहे. परिणामी कामाच्या गुणवत्तेवर मात्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विधान परिषद व विधानसभा सदस्यांच्या निधी अंतर्गत त्यांच्या कार्यकर्त्यांनी सुचविलेल्या ठिकाणी सिमेंट काँक्रीटचे रस्ते मंजूर करण्यात आले आहे. एकदा का कामाचे लोकेशन मंजूर झाले की त्यावर आवश्यक असणारा फंड सदर लोकप्रतिनिधींच्या विकासनिधी अंतर्गत मंजूर करण्यात येतो. मग जिल्हा नियोजन समितीकडून त्या कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तेथून टेंडर नोटीस, कामवाटप, कंत्राटदारांची नियुक्ती व प्रत्यक्ष कामाला सुरवात, मग कामाचे मोजमाप आणि अंतिम क्षणी कामाचे पेमेंट अशा प्रवासात या कामांना अंतिम रूप दिल्या जाते. मागील काही वर्षांअगोदर कार्यकर्ते आपल्या नेत्यांना आवश्यक ठिकाणच्या कामांचे लोकेशन देऊन काम मंजूर करून घ्यायचे. परंतु त्यानंतर काम होईपर्यंत त्यामध्ये कुठलाच कार्यकर्ता हस्तक्षेप करीत नव्हता. परंतु आता परिस्थिती पूर्णतः बदललेली दिसून येत आहे. आता नेत्यांपासून कार्यकर्त्यांपर्यंत वेळप्रसंगी पक्ष बदल होत असल्याने निवडून आलेल्या नेत्याला आम्हीच तुम्हाला निवडून आणले, त्यासाठी आम्ही प्रचंड परिश्रम घेतले तन-मन-धनाने ही वेळप्रसंगी सहकार्य केले. याची पावलोपावली जाणीव नेत्याला करून दिल्या जात आहे. अशावेळी काही कार्यकर्त्यांमध्ये स्वतःचे वर्चस्व वाढविण्यासाठी कामांचा आधार घेणे सुरू झाले आहे. किंबहुना ते स्वतःच कंत्राटदार म्हणून समोर येत आहेत. त्यांच्यातच स्पर्धा निर्माण झाल्याने फंड उपलब्ध नसतानाही रस्ता बांधकाम सारख्या कामांना ते पूर्णत्वास नेत आहेत.

ही गावविकासासाठी एक चांगली बाब आहे. परंतु असे करताना केलेल्या कामाचे पेमेंट किती दिवसांनंतर मिळेल व ते मिळताना व्याज, चक्रीवाढ व्याज यासारख्या बाबींचा विचार करून खर्च केलेल्या रुपयांमध्ये नफा मिळेल की तोटा याचा थोडादेखील विचार न करता अशी कामे जोरात पूर्ण होत आहेत. यादरम्यान मात्र त्यांच्याकडून करण्यात येत असलेल्या कामाच्या गुणवत्तेवर त्याचा पूर्णतः परिणाम काही दिवसांतच दिसून यायला सुरवात झाली आहे.

# हरित अमरावतीच्या दिशेने महानगरपालिकेचे पाऊल

# जागतिक पर्यावरण दिनी वृक्षारोपण व पर्यावरण संरक्षणाची शपथ

### वृक्ष लागवडीतून पर्यावरण संरक्षणाचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती,**
जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून अमरावती महानगरपालिका अंतर्गत माझी वसुंधरा अभियान तसेच राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत आज शुक्रवार, दि. ५ जून २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता विशेष वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महानगरपालिकेच्या उद्यान विभागातर्फे मनपा दवाखाना आसिर कॉलनी, तारखेडा, नमक कारखाना मागे वलगाव रोड येथे असलेल्या महानगरपालिका जागेवर हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व पर्यावरणपूरक वातावरणात पार पडला.




जागतिक स्तरावर हवामान बदल, वाढते तापमान, वायू प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधनांवरील वाढता ताण या गंभीर आव्हानांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षणाची जनजागृती करण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धनाची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान विविध प्रकारच्या स्थानिक व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली.

सदर कार्यक्रम वर्षा लड्डा, आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना पर्यावरण रक्षणासाठी केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता वर्षभर सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. शहराचा पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड आणि त्यांचे संगोपन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान माझी वसुंधरा अभियान शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आयुक्त वर्षा लड्डा यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पर्यावरण संरक्षण, जलसंवर्धन, ऊर्जा बचत, प्लास्टिकमुक्त परिसर निर्मिती आणि हरित विकासासाठी सामूहिक शपथ घेतली. वातावरणीय कृती, निसर्गापासून प्रेरित, वातावरणासाठी आपल्या भविष्यासाठी या घोषवाक्याला अनुसरून सर्वांनी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करण्याचा निर्धार व्यक्त केला.

वृक्षारोपण उपक्रमात सहभागी होत सर्वांनी पर्यावरण संवर्धनासाठी आपले योगदान देण्याची तयारी दर्शविली. लागवड केलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन व संरक्षण करण्याची जबाबदारीदेखील दवाखान्यातील डॉक्टर व कर्मचारी यांनी स्वीकारली.जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून पर्यावरणाबद्दलची सामूहिक जबाबदारी अधोरेखित करणारा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेने आयोजित केलेल्या या उपक्रमातून शहरात हरित क्षेत्र वाढविणे, वायू प्रदूषण कमी करणे आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

वाढते शहरीकरण, घटते हरित क्षेत्र आणि बदलत्या हवामानाच्या परिस्थितीत वृक्ष हे पर्यावरणाचे खरे रक्षक असल्याचे अधोरेखित करत या कार्यक्रमातून नागरिकांनीही मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाच्या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी केले आहे.

पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित या वृक्षारोपण कार्यक्रमामुळे शहरात पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण झाली असून, हरित आणि स्वच्छ अमरावती घडविण्याच्या दिशेने महानगरपालिकेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याचे दिसून आले.